२५१७

म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

संग्रहालय क्रमांक ७५ २०५

लेखक रामचंद्र आपाजी चिपळूणकर

१८

पुस्तकाचें नांव राष्ट्रीय सभेबद्दल दोन शब्द

७५
सं. क्र.

राष्ट्रीय सभेबद्दल दो
शब्द. निबंध

. ग्रं. सं. ठाणें
निबंध
२०५
९८८२

थानच्या

# राष्ट्रीय सभे बद्दल

# दोन शब्द.

श्लोक

सुवर्णें गंधें वा मधुर मकरंदें कमलिनी ॥
जशी आनंदा दे परम रमणीया त्रिभुवनीं ॥
सुनंदा स्नेहार्द्रा भरतकुलकल्याणजननी ॥
सभा राष्ट्रीया ती सकल सुखदा हो गुणगणीं ॥ १ ॥

सातारा शुभसूचक छा०

नोवेंबर सन १८९२.

सातारा शुभसूचक कचेरी
ता० १९-१२-९२.

रा० रा० वृत्तसारकर्ते कुमावांस
यांस.

वि० वि० आज रोजीं 'राष्ट्रीयसभेबद्दल दोन शब्द' या नांवाचें पुस्तक आपणांस प्रेमपूर्वक नजर पाठविलें आहे. 'भारत भाग्योदय' रूपानें गेल्यावर्षी राष्ट्रीय सभेची ज्या गृहस्थानीं सेवा केली होती त्यानींच सदरहू पुस्तक सातार जिल्ह्यांतील खालच्या प्रतीच्या लोकांस राष्ट्रीयसभेची माहिती देण्या करितां तयार केलें असून तें बोरगांव येथील छोट्या कांग्रेस पुढें वाचून दाखविण्यांत आलें व तें सर्वांस फार पसंत पडलें हें कळविण्यास आनंद वाटतो. कृपाकरून आपणही सदर पुस्तकावरील आपला अभिप्राय सत्वर प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. कळावें लोभ असावा ही विनंति.

रा० आ० चितळे.
शुभसूचक छा० मालक

नि. ९८५

हिंदुस्थानच्या

# राष्ट्रीय सभेबद्दल दोन शब्द.

हें पुस्तक

दक्षिणप्रांतस्थ राष्ट्रसभाप्रतिनिधि

( 'भारतभाग्योदय' वगैरे पुस्तकांचे कर्ते )

ह्यांनीं केलें

तें

रामचंद्र आप्पाजी चितळे

ह्यांनीं सातारा येथें आपल्या 'शुभसूचक' छा॰

छापून प्रसिद्ध केलें.

नोव्हेंबर सन १८९२.

किंमत २ आणे.

(सर्व हक्क मालकानें आपल्याकडे ठेविले आहेत.)

वाळवे तालुक्यांतील प्रसिद्ध वकील
रा॰ सा॰ गोविंद धोंडदेव लिमये व इतर
सद्गृहस्थ ह्यांच्या परिश्रमानें
संस्थापित झालेली

**'छोटी कांग्रेस'**

अथवा

**सातारा जिल्ह्यांतील शेतकरी वगैरे खालच्या
प्रतीच्या सर्व जातींच्या रयतेची वार्षिक सभा**

व

इतर ठिकाणच्या स्टांडिंग कांग्रेस कमेट्या आणि
राष्ट्रीयसभेसंबंधानें झटणारे इतर सद्गृहस्थ

ह्यांस

हें पुस्तक प्रेमपूर्वक अर्पण केलें आहे.

# ए.ओ. ह्यूम.



(राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी.)

# राष्ट्रीय सभेबद्दल दोन शब्द.

( एक प्रेमळसें मूक व्याख्यान. )

स्वदेशबांधवहो,

हिंदुस्थान ह्मणजे ज्यास पुराणांतरीं आर्यावर्त किंवा भारतवर्ष ह्मणतात, तो आपला देश होय. हा देश केवढा अफाट आहे हें आपणांस माहीत असेलच. ह्या आपल्या देशावर श्रीराम, युधिष्ठिर, भोज, विक्रम इत्यादि राजांनीं प्राचीन काळीं राज्य केलें; पुढें अर्वाचिन काळीं अकबर, औरंगजेब, वगैरे मुसलमान बादशहा झाले. औरंगजेबाचे कारकीर्दीमध्यें स्वधर्माभिमानी श्री शिवाजी महाराज अवतीर्ण होऊन त्यांनीं महाराष्ट्रामध्यें हिंदुपद पादशाही स्थापन केली. तिच्या गादीवर थोरल्या शाहू महाराजांसारखे दैवशाली प्रभू होऊन गेले. पुढें मग पेशवाई झाली. थोरले बाजीराव साहेब आणि थोरले माधवराव साहेब केवढे पराक्रमी पेशवे होते हें आपणांस सांगावयास नकोच. इसवी सन १८१८ सालीं शेवटच्या बाजिरावानें इंग्रजांना राज्य दिलें. पुढें हे इंग्रज लोक आपल्या शहाणपणानें व उद्योगानें बळावत जाऊन आज सर्व महाराष्ट्राचेंच काय, पण सर्व हिंदुस्थानचे राजे झाले आहेत. अहाहा!

काय त्यांची थोरवी! सर्व देशावर तारायंत्रें, आगगाड्य
आणि कितीतरी सुधारणा केल्या आहेत. राज्याचा बं
दोबस्त तरी केवढा खंबीर केला आहे? प्रजेच्या सुख
करितां कायदे कानू केले आहेत, लोक संरक्षणाकरित
पोलिस शिपाई नेमिले आहेत, परराष्ट्राच्या पारिपत्य
करितां केवढें जंगी सैन्य ठेविलें आहे? हें इंग्रजीराज्य
ह्मणजे पूर्वीचें रामराज्य ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं
पहा, आतां कोठेंतरी पेंढार आहे कां? खरोखर, महा
राणी विक्टोरिया—ज्या आपल्या देशाच्या बादशाहि
णी आहेत—त्यांची केवढीतरी ही शहामत आहे! ह्या
राज्याच्या बंदोबस्तावरून व सुखसोईवरून "काठील
सोनें बांधून खुशाल काशीयात्रेस जावें" अशी ह्मण
पडली आहे. धन्य धन्य हें इंग्रजी राज्य यांत शंक
नाहीं!!

सोन्याची गोष्ट व इंग्रजी राज्याच्या सुखसोईची
गोष्ट तोंडांतून बाहेर काढतांच, पुष्कळ लोकांस अशी
शंका येईल कीं, "छे! छे! ही इंग्रजी राज्याची व्यर्थ
थोरवी गाणें होय! सोनें काठीला बांधून नेण्यासारखी
सोय झाली आहे खरी, पण सोनें आहे कोठें? अहो,
अन्नावांचून लोकांचे प्राण कासावीस होतचालले आहेत,
जवळची सर्व माया संपून गेली तरी अन्न मिळेना. अन्न
तरी कसें मिळावें? अहो, अगोदर पर्जन्य फार थोडा
पडत आहे, त्यामुळें शेताचें उत्पन्न मागच्या सारखें
कोठें होत आहे? पुनः त्यास सत्रा हजार विघ्नें आहे-
तच! मागें कसें एकेका बिघ्यांत पांचपांच मण धान्य

उत्पन्न होत असे, आणि आतां पहावें तों पुरत्या आठ पायलीही होत नाहींत!! शेताला अगोदर पाऊस कमी, त्यांतून खात तरी कोठें मिळत आहे? राम राम! खाताची गोष्ट काढिली कीं अंगावर कांटाच उभा राहतो! अहो, गुरांनां चारा नाहीं!! परमेश्वरानें निर्माण केलेलें गवत फुकट नव्हे, पण विकत देखील मिळेनासें झालें आहे! दिवसेंदिवस गाईचा संहार होत चालला आहे! मग शेताला खात मिळावें कसें व पिकें तरी चांगलीं उत्पन्न व्हावीं कशीं? बरें, कसें तरी करून शेताच्या पिकाची थोडीशी आशा केली तर तें राहूं कोण देत आहे? रानडुकरें, लांडगे आणि कोल्हीं पार सप्पा उडवीत आहेत! हाय हाय!! त्यांचा बंदोबस्त करण्यास आमच्या जवळ शस्त्र नाहीं! एखादी बंदूक किंवा तरवार असती तर त्यांचा फडशाच उडविला असता! बरें, इतक्यांच्या जाचांतून शेत पिकून त्याचे चार दाणे उत्पन्न होतील तर काळीचा पाटील दत्त ह्मणून उभा आहे! सरकार सारा भरतां भरतां पुरेवाट झाली आहे! ह्यांतून शिल्लक पडून ओली कोरडी भाकर खाऊं ह्मणावें तर मीठ तरी कोठें आहे? मीठ ह्मणजे समुद्राचें पाणी! तें देखील सरकारानें महाग करून सोडलें!! इतक्यांतूनही स्वस्थ राहूं ह्मटलें तर पुनः चोऱ्या, मारामाऱ्या, आणि भाऊबंदांचे तंटे हात धुऊन पाठीस लागलेले!! सरकारच्या कोडताची भर करितां करितां सर्व नाहींसें होत आहे!! तेथें तरी न्याय? तेथें ही सावळा गोंधळच! अशा प्रकारें प्रजेची सर्व रीतीनें नाग-

वण झाली असून जर इंग्रजी राज्याला रामराज्य ह्मटलें तर कसें शोभेल? ”

मित्रहो, ही आपली शंका अगदीं बरोबर आहे. आपली खरोखर तशी स्थिति झाली आहे, हें कोणी ही कबूल करील; तथापि एवढ्यावरून आम्ही इंग्रजी राज्याची जी थोरवी वर्णन केली आहे, ती मात्र आपण खोटी आहे असें मानूं नका. कारण, आपले राज्यकर्त्ते फार शहाणे, कल्पक आणि मानवी हक्क पालन करण्यांत पूर्ण दक्ष असे आहेत. हिंदुस्थानांत त्यांचें राज्य झाल्या पासून त्यांनीं ज्या पुष्कळ सुधारणा केल्या आहेत त्यांचा धन्यवाद गाणें अगदीं योग्य आहे. आतां आपण असें म्हणाल कीं, “ आमचे राज्यकर्ते इतके चतुर व प्रजेच्या सुखार्थ इतके मनःपूर्वक झटणारे आहेत, तर मग ह्या आमच्या कंगाल स्थितीचा विचार ते कां करीत नाहीत?” वाः, आपण ही फार चांगली शंका काढलीत. ह्या शंकेचें समाधान करणें किंचित अवकाशाचें काम आहे, तथापि आपणांस तें आह्मीं थोडक्यांत स्पष्ट करून सांगतों. आपलें जें हें इंग्रज सरकार आहे, तें अगदीं परकें ह्मणजे ४००० कोसांवर जो इंग्लंड ह्मणून देश आहे त्या देशांतलें आहे. त्यांचा हिंदुस्थानांत अम्मल होऊन आज पन्नास पाऊणशें वर्षें झालीं, तथापि त्यांना आपल्या लोकांची खरी खरी स्थिति समजली नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे. ह्याचीं कारणें दोन आहेत. एक त्यांचे व आमचे रीतिरिवाज वगैरे सर्व कांहीं भिन्न असल्यामुळें व विशेषतः ते किंचित परकेपणानें आमच्या-

नामदार दादाभाई नवरोजी.



(कलकत्ता येथील १८८६ च्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष)

नि ४०९

शीं वागत असल्यामुळें आमची खरी स्थिति त्यांना कळत नाहीं आणि दुसरें, आह्मी हिंदुस्थानवासी लोक फार सहनशील व शांत वृत्तीनें वागणारे असल्यामुळें आह्मींही त्यांच्याकडे जाऊन आपली खरी स्थिति सांगितली नाहीं, त्यामुळें, आजपर्यंत हिंदुस्थान ह्मणजे सुवर्णभूमि, ह्या पोकळ समजावर आमचें सर्व कांहीं अबादीअबाद आहे असें सरकार मानीत चाललें, आणि त्याचा हा असा दुःखदायक परिणाम झाला!! त्या मुळेंच आमची सर्वस्वी शोचनीय स्थिति होऊन तिच्या पायीं आह्मांवर आज उपाशीं राहण्याची पाळी यावी ह्यांत आश्चर्य तें काय? आपण कल्पना करा कीं, आपण एक फार दूध देणारी सुरतेकडची गाय विकत घेतली आणि गोठ्यांत नेऊन बांधली; व तिच्या चाऱ्या पाण्याचा कांहीं विचार न करितां तिच्यावर केवळ दुधापुरतीच नजर ठेविली आणि इकडे त्या बिचारीस वैरणी करितां हंबरणें ह्मणजे काय हें स्वप्नींही माहित नसलें ह्मणजे त्या बिचाऱ्या गाईची काय अवस्था होईल बरें? तशा पैकींच आमचा प्रकार झाला आहे. तेव्हां ह्यास कांहीं तरी उपाय काढला पाहिजे. खरोखर आपण देखील कोणता उपाय योजावा हें सहज सांगाल! अर्थात् गाईस जसें मोठमोठ्यानें हंबरून मालकाजवळ वैरणीची दाद लावणें अवश्य आहे, तशी आपणही सर्व देशांतील लोकांनीं एकत्र होऊन, आपल्या कृपाळू व शहाण्या राज्यकर्त्या मालकाजवळ सर्व स्थिति निवेदन करून आपली दाद लावली ह्मणजे झालें.

हा विचार कोणास बरें पसंत पडणार नाहीं ? आमची तर अशी खातरी आहे कीं आपण ह्या क्षणींच "चला सरकाराकडे जाऊं" असें ह्मणाल. पण तशारीतीनें सरकाराकडे जाऊन कांहीं उपयोग नाहीं. त्यांच्याकडे दाद लावायाची ह्मणजे प्रथम आपल्यापैकीं चार शहाण्या मंडळींनीं एकत्र जमून आपलीं संकटें काय आहेत त्याचा विचार केला पाहिजे व त्या संकटांच्या निवारणाचे उपाय सरकारास सुचविले पाहिजेत. ह्या करितां प्रथम आपल्यांतील शहाण्या, समजदार, व अनुभविक लोकांची एक सभा झाली पाहिजे. खरोखर हे शब्द ऐकतांक्षणींच आपणांस वाटेलकीं गांवोगांवीं एकदम निरोप पाठवून चांगल्या सूज्ञ माणसांना ताबडतोब बोलवावें आणि एकदां ह्या गोष्टीचा विचार करावाच करावा.

मित्रहो, मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं आपणांस त्याबद्दल तसदी घेण्याचें मुळींच कारण राहिलें नाहीं. आपल्या ह्या स्थितीचा लक्ष्यपूर्वक विचार करून आपल्या देशांतील सर्व प्रकारच्या आणि सर्व जातींच्या पुढारी व विद्वान गृहस्थांनीं ह्या बद्दल एक सभा स्थापन केली आहे. तिला **राष्ट्रीयसभा** असें ह्मणतात. 'राष्ट्रीय सभा' 'राष्ट्रीय सभा' म्हणून जो शब्द आलीकडे आपल्या कानीं पडतो ती हीच सभा होय. आतां मात्र आपणांस खचित खचित ह्या सभेची माहिती ऐकण्याची उत्कंठा झाली असेल. कारण आपल्या हिताची जी गोष्ट आहे ती प्रथम नीट समजून घेऊन तिच्या अनुरोधानें वर्तन करणें हें सूज्ञ मनुष्याचें कर्तव्यच होय. असो,

तर मग आपणांस ह्या सभेची थोडीशी हकीकत सांगणें अवश्य आहे.

राष्ट्रीयसभा ही अति विद्वान, थोर, स्वदेशहितेच्छु, अशा सर्व जातींच्या आणि सर्व धंद्यांच्या लोकांची एक मंडळी आहे. ही सन १८८९ सालीं प्रथम मुंबई येथें सुरू झाली आहे. ही मंडळी प्रत्येक वर्षाच्या शेवटीं —नाताळच्या सुटीमध्यें— हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य ठिकाणीं भरत असते. आजपर्यंत तिच्या सात सभा मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद आणि नागपूर ह्या ठिकाणीं झाल्या. तेथें प्रत्येक गांवांतून पाठविलेले सर्व प्रकारचे मुखत्यार ह्मणजे प्रजेच्या तर्फेचे पंच आले होते. त्यांनीं एकत्र जमून आपल्या देशावरील राजकीय संकटांचें फार चांगलें विवेचन केलें, आणि सर्वानुमतें तत्संबंधाचे योग्य उपाय निवडून काढून ते उपाय आपल्या कृपाळू सरकारापुढें अर्जाच्या रूपानें मांडले आहेत.

आतां ह्या सभे मध्यें येणारे लोक कोणत्या प्रकारचे असतात व ते कोणत्या गोष्टींचा विचार करितात, ह्याची माहिती आपणांस सांगितली तर ह्या सभे पासून पुष्कळ फायदा आहे, असें आपणांस खास दिसून आल्यावांचून राहणार नाहीं.

हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणांहून, ह्मणजे वायव्य प्रांतांतील काशी, लखनौ, अलाहाबाद, अयोध्या, वगैरे प्रसिद्ध शहरांमधून; बंगाल प्रांतांतील कलकत्ता, डाका, राजशाही, भागलपूर, छोटानागपूर, वगैरे ठिकाणांहून;

सर सवाई रामस्वामी मुदलीआर वगैरे गृहस्थ फार मोठे जहागीरदार असून ते राष्ट्रीय सभेबद्दल अत्यंत निष्ठा दाखवितात. ते राष्ट्रीय सभेस येतात एवढेंच नव्हे पण ते स्वतः तिची पडेल ती सेवा करितात. ह्या शिवाय, दुर्भंग्याचे महाराज, (ह्यानींतर अलाहाबादच्या सभेस तंबू वगैरे लागेल तें सामान देऊन फार चांगली मदत केली होती), महाराज सयाजीराव गायकवाड, ह्मैसूरचे महाराज, त्रावणकोरचे महाराज, कोचीन, विजयानगर, व्यंकटगिरी, बोबिली, इत्यादि ठिकाणचे राजे साहेब, त्रिपतीचे महंत, वगैरे मोठमोठे राजे लोकांस राष्ट्रीय सभेची कृति पसंत असून ते तिला थोडीबहुत मदतही करितात. राष्ट्रीय सभेमध्यें निरानिराळ्या ठिकाणांहून मोठमोठे लोक कोण कोण येतात हें सांगूं लागलों, तर एक मोठें पुस्तकच होईल. असो, तात्पर्य ही सभा साधारण लोकांची नसून, तींत सर्व प्रकारचे, सर्व जातींचे आणि सर्व धर्माचे लोक आहेत हें अगदीं सत्य आहे. तथापि कित्येक विघ्नसंतोषी पुरुष असें म्हणतात कीं, ह्या सभेस मुसलमान लोक अनुकूल नसल्यामुळें ही फक्त 'हिंदु लोकांची सभा' आहे, पण ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे. प्रत्येक सभेमध्यें पुष्कळ मुसलमान येतात एवढेंच नव्हे, पण मद्रासच्या सभेचे ऑनरेबल बद्रुद्दिन तय्यबजी हे मुसलमान गृहस्थ अध्यक्ष झाले होते. त्यावेळीं त्यांणीं असें स्पष्ट सांगितलें कीं, "मुसलमान लोक ह्या राष्ट्रीय सभेपासून अलग आहेत, असें जें कित्येक ह्मणतात तें

गुजराथ व सिंध प्रांतांतून; मुंबई इलाख्यांतील पुणें, सातारा, सोलापूर, धारवाड, अहमदनगर, बेळगांव, विजापूर, वगैरे सर्व शहरांतून; मद्रासेकडील बल्लारी, कर्नूल, तंजावर, विजागापट्टण, त्रिचनापल्ली, मधुरा, पालघाट वगैरे सर्व जिल्ह्यांतून राष्ट्रीय सभेस मोठमोठे विद्वान लोक येतात. त्यांमध्यें सर्व जातींचे म्हणजे हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन वगैरे सर्व लोक असतात. पुष्कळ साहेब लोकही ह्या सभेचे मित्र आहेत. मि० ह्यूम ह्या नांवाचे हिंदुस्थानामध्यें मोठमोठीं सरकारी कामें करून पेनशन घेतलेले फार दयाळ गृहस्थ आहेत, ते ह्या राष्ट्रीय सभेस आपला जीव कीं प्राण समजतात, एवढेंच नव्हे, पण ते साहेब, ह्या सभेप्रीत्यर्थ काया वाचा मनेंकरून रात्रंदिवस झटत असतात. खरोखर केवढीही परोपकारबुद्धि! ह्या साहेबां सारखेच दुसरे वेडरबर्न, डिग्बी, केन, एलिस वगैरे विलायतेंतील उदार मनाचे थोर युरोपियन ह्या सभेची फार काळजी बाळगितात. हिंदुस्थानांतील कित्येक युरोपियन, म्हणजे मद्रासचे नॉर्टन व अडाम, अलाहाबादचे हावर्ड, मुजफरपुरचे प्रिंगल केनडी, आणि मि० क्रौले, क्यापटन बेनन, रेव्हरंड इव्हान्स वगैरे इतर सद्गृहस्थ ह्या राष्ट्रीय सभेचे निस्सीम भक्त आहेत, व हिंदुस्थानच्या लोकांचें कल्याण व्हावें ही त्यांची उत्कट इच्छा आहे. ह्या गृहस्थांप्रमाणें आपले मोठमोठे हिंदुलोकही आहेत. रामपूरचे राजा रामपालसिंग, कलकत्याचे महाराज सर जोतेंद्र मोहन टागोर, महाराज विजयकृष्ण बहादूर, मद्रासचे

# बाबू सुरेन्द्रनाथ बानर्जी.



(प्रसिध्द वक्ते व राष्ट्रीय सभेचे दुय्यम चिटणीस कलकत्ता)

बरोबर नाहीं; निदान तिसऱ्या राष्ट्रीय सभेसंबंधानें तसें म्हणण्यास कोणी समर्थ होणार नाहीं. कारण, ह्या सभेच्या अध्यक्षस्थानाचा मीं, माझी प्रकृती अस्वस्थ असतांना देखील जो स्वीकार केला, तो फक्त ह्या उत्कट इच्छेनें केला कीं, मी स्वतः तर ह्या सभेचा भक्त आहेच, पण ज्या अंजुमन-इ-इसलाम नामक मुसलमान सभेनें मला येथें पाठविलें आहे, ती सभा देखील राष्ट्रीय सभेस अनुकूल आहे, असें जगजाहीर व्हावें." या मुसलमान गृहस्थानीं आणखीं असेंही सांगितलें कीं, हिंदुस्थानामध्यें ज्ञातिपरत्वें सामाजिक, नैतिक, शिक्षण संबंधीं किंवा समयविशेषीं राजकीय गोष्टींत देखील सर्वांस एकत्र होण्याला अनंत अडचणी आहेत, परंतु सर्व देशास लागू असणाऱ्या ज्या सर्व साधारण राजकीय गोष्टी आहेत त्यांची सुधारणा करण्यासाठीं सर्वत्रांस एकत्र होण्यास कांहीं हरकत नाहीं. आपली राष्ट्रीयसभा ही फक्त सर्वदेशीय राजकीय गोष्टींचा विचार करणारी मंडळी असल्यामुळें मुसलमानांनीं देखील तिला मिळण्यास बिलकुल अनमान करूं नये.' हेंच मत मुसलमान लोकांचे संबंधानें मुंबई, मद्रास, बंगाल आणि वायव्यप्रांत इतक्या ठिकाणीं प्रचलित आहे. ह्या बद्रुदिन तय्यबजींच्या ह्मणण्याचा आज पर्यंत पुष्कळ अनुभव येत चालला आहे. मध्यंतरीं अल्लीगडचे सर सय्यद अह्मद ह्या नावाचे एक बडे मुसलमान गृहस्थ, राष्ट्रीयसभेच्या विरुद्ध मुसलमानलोक आहेत असें दाखविण्याचा कांहीं प्रयत्न करीत होते,

आन॰ बद्रुद्दिन तय्यबजी.



(मुंबईचे ब्यारिस्टर व ३ऱ्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.)

पण तो त्यांचा प्रयत्न हल्लीं जागच्या जागींच थिजला आहे. राष्ट्रीय सभेस सर्व ठिकाणचे मुसलमान गृहस्थ प्रतिवर्षी नियमानें येतात एवढेंच नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानांतील रिफा-इ-आम नामक एका मोठ्या मुसलमान सभेचे अध्यक्ष शेख रेझा हुसेनखान यांच्या सारखे सर्वमान्य मुसलमान असा बाणा बाळगीत आहेत कीं, ही राष्ट्रीयसभा मुसलमान लोकांची नव्हे असें ह्मणणारे जे कोणी असतील त्यांनीं आमच्या पुढें यावें, म्हणजे त्यांच्या या असत्य वचनाच्या चिंधड्या उडविण्यास एक नव्हे, दोन नव्हे, तर पन्नास हजार मुसलमान राष्ट्रीय सभेस अनुकूल असल्या बद्दल सह्या देण्यास तयार आहेत.

मुसलमान लोकांप्रमाणें पंजाबाकडील शीख लोकही या सभेस अनुकूल आहेत. डेराइस्माइलखान नांवाचें पंजाब प्रांतांत एक शहर आहे, तेथून मलिक भगवानदास या नांवाचे एक प्रतिनिधी राष्ट्रीय सभेस येत असतात. ते ह्मणतात कीं, "ज्यांस राष्ट्रीय सभा ही फक्त बंगाली बाबूंची आहे, असें वाटत असेल त्यांनीं माझ्याकडे पहावें, मीं जर त्यांस बंगाली बाबू दिसलों तर त्यांनीं खुशाल तसें ह्मणावें; पण मजकडे पाहिल्या बरोबर त्यांस मीं एक पंजाबी गृहस्थ आहें असें वाटल्या शिवाय राहणार नाहीं; व त्यांनीं यावरून असें पक्कें समजावें कीं, मीं एकटाच पंजाबी या राष्ट्रीय सभेचा भक्त नसून माझे सर्व पंजाबी बांधव तिचे पूर्ण मित्र आहेत." तात्पर्य सर्व ठिकाणच्या लोकांस राष्ट्रीय

सभा पसंत आहे यांत आतां मुळींच संशय राहिला नाहीं.

आतां ही राष्ट्रीय सभा राजकीय मागण्या करिते त्या अर्थीं ती राजद्रोही आहे, असा कित्येक नेटिव द्वेष्ट्या, अनुदारमनाच्या ऑंग्लो इंडियन लोकांचा आरोप आहे, पण तो सर्वथैव मिथ्या आहे. राष्ट्रीयसभेस येणारे लोक किती विचारी व राजनिष्ठ आहेत हें पाहिलें असतां हा आरोप केवळ मत्सरबुद्धीनें उत्पन्न झालेला आहे असें समजून येईल. मद्रासचे कै० राजे सर टी. माधवराव हे गृहस्थ कांहीं वर्षांपूर्वीं बडोद्यास दिवाण होते, व यांना इंग्रज सरकारच्या दरबारांत अति मोठा मान होता हें सर्वांस माहित असेलच. सन १८८७ सालीं मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळीचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं "राष्ट्रीय सभा ही उत्तम व अति फायदेशीर आहे, एवढेंच नव्हे तर ती ब्रिटिश राष्ट्राच्या वैभवाचा मुकुट आणि इंग्रजी राज्यव्यवस्थेचा अत्यंत तेजःपुंज विजय आहे." असें सांगितलें.

कारण, या आपल्या कृपाळू सरकारानें जें सुशिक्षण दिलें त्याच्याच योगानें आह्मांस आमचीं राजकीय संकटें समजूं लागून, तीं नाहींशीं करण्याचा उत्तम मार्ग जो राष्ट्रीय सभा, तो आह्मीं साध्य करून घेतला हें अगदीं योग्य झालें असें त्यांचें मत आहे, व तें अगदीं खरें आहे. प्रयागचे सुप्रसिद्ध वकील व खरे देशभक्त ऑनरेबल पंडित अयोध्यानाथ– ज्यांच्या

कै० आन० पंडित अयोध्यानाथ.



(राष्ट्रीय सभेचे माजी दुय्यम सेक्रेटरी-अलाहाबाद.)

अकालिक व आकस्मिक मृत्यू बद्दल अलाहाबाद हायकोर्टाचे चीफ जस्टिस व इतर मोठमोठे सरकारी कामदार आणि सर्व प्रजाजन फार हळहळत आहेत— त्यांनीं सन १८८८ सालीं अलाहाबादच्या राष्ट्रीयसभेंत असें बोलून दाखविलें कीं, "माझा असा पक्का भरंवसा आहे कीं, माझ्या स्वदेशबांधवांप्रमाणें राजनिष्ठ असे लोक कोठेंही सांपडणें अशक्य आहे." हे शब्द कितीतरी महत्वाचे आहेत! याच गृहस्थांनीं आणखीं असेही उद्गार काढले होते कीं, "जर प्रसंग येईल तर इंग्रजसरकारास आह्मींच उत्तम प्रकारची मदत करून स्वराजनिष्ठा व्यक्त करूं. या वेळीं आमचे प्रतिपक्षी कधींही उपयोगीं पडणार नाहींत." हें खरें आहे. राष्ट्रीयसभेचे दुसरे भक्त कलकत्याचे फार नामांकित गृहस्थ व हिंदुस्थानांतील अप्रतिम वक्ते बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं एके वेळीं असें ह्मणन दाखविलें कीं, आह्मीं इतके राजनिष्ठ आहोंत कीं, खुद्द स्वामिनिष्ठेचा डौल दाखवून स्टेटसेक्रेटरी (हिंदुस्थानचे वरिष्ट अधिकारी) यांच्या खाजगी दरबारांत पुढें पुढें गोंडा घोळणारे आणि अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करणारे जे सरकारी कामगार आहेत त्यांची राजनिष्ठा आमच्या राजनिष्ठेच्या पासंगासही पुरणार नाहीं! याचें कारण, आह्मीं अत्यंत प्रेमपूर्वक आपलीं संकटें सरकारास विदित करून, इंग्रजसरकारची राज्यरीति सुखकारक व चिरकालिक करण्याचा प्रयत्न करीत आहोंत, परंतु कांहीं इंग्रजी कामगार सरकाची मर्जी संभाळण्या करितां प्र-

जेच्या दुःखांकडे लक्ष देत नाहींत!! या वरून सरकारचे खरे हितचिंतक आह्मींच आहोंत असें सिद्ध होत नाहीं काय? राष्ट्रीयसभा खरोखर राजनिष्ठ आहे हें वरील हकीगतीवरून कोणीही सांगूं शकेल, तथापि कोणास या संबंधानें प्रत्यक्ष अनुभव पाहिजे असेल तर पुढील राष्ट्रीयसभेच्या मागण्यां वरून तो त्यांस पूर्णपणें अवगत होईल.

मित्रहो, राष्ट्रीय सभा सरकाराजवळ किती योग्य व सयुक्तिक मागण्या करीत आहे हें आपण लक्षपूर्वक अवलोकन कराल, तर आपणांस खातरीनें असें दिसेल कीं, त्या तिच्या मागण्या ह्मणजे शुद्ध अमृत आहे; त्या अमृताचा जर आपण उपयोग केला नाहीं तर ईश्वराच्या घरीं आपण खचित खचित महापातकी ठरूं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रथमतः आपण प्रत्येक मनुष्याच्या प्राणरक्षणास अत्यंत अवश्यक असें जें उदरभरण त्याचा विचार करूं. आपण जर वृद्ध मनुष्यांस पूर्वींच्या गोष्टी विचारूं लागलों आणि त्यांच्या माहितीची व प्रस्तुतच्या स्थितीची तुलना करावयास लागलों, तर आपणांस असें दिसून येईलकीं, सांप्रतची आपली स्थिति अगदीं दीनवाणी झाली आहे. या स्थितीच्या शास्त्रीय कारणांचा खोल विचार जरी केला नाहीं तरी आपणांस तिचें एक अगदीं उघड दिसणारें कारण सांगतां येईल. तें कोणतें ह्मणाल तर अन्नाची भ्रांति! ह्मणजे आपणांस पोटभर अन्न मिळत नाहीं!! खरोखर अन्नमय प्राण व

प्राणमय पराक्रम ह्मणून जी ख्याति आहे ती कांहीं खो-टी नव्हे. पूर्व कालीं मोठ मोठीं शौर्याचीं कृत्यें करून त्रिभुवनांत गाजलेल्या पूर्वजांचे आह्मीं वंशज खरे, पण आह्मांस आज पोटभर अन्न न मिळाल्यामुळें आह्मीं अगदीं तेजहीन, शक्तिहीन व अभिमान हीन झालों आहोंत. आमच्या पैकीं सुमारें ७ कोटी लोकांना पोटभर अन्न मिळत नाहीं अशी सर विल्यम हंटर सारख्यांचीही खात्री होऊन चुकली आहे. हिंदुस्थानच्या लोकांच्या दारिद्र्याबद्दल ऑनरेबल दादाभाई नवरोजी, दिनशा एदलजी वाचा वगैरेनीं चांगलें सप्रमाण विवेचन केलें आहे. दप्तरीं दाखल असलेल्या माहितीवरून असें समजतें कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाचें उत्पन्न प्रत्येकीं ३० रुपये आहे आणि इंग्लंडांतील प्रत्येक माणसाचें उत्पन्न ९०० रुपये आहे. यावरून पाहिलें तरी देखील आमची स्थिती फार शोचनीय आहे असें सिद्ध होत नाहीं काय? तर याचें मुख्य कारण जमिनीवरील जबर सारा आणि आमच्यावर वारंवार लादले जाणारे मोठमोठे कर हें होय. जमिनीच्या धाऱ्यासंबंधानें मुर्शिदाबादचे वैकुंठनाथसेन, मद्रासचे ऑनरेबल सुब्रह्मण्य अय्यर, अलाहाबादचे मुनशी सदरुद्दीन अहमद, उमरावतीचे रंगराव मुधोळकर, तंजावरचे रत्नसभापति पिल्ले वगैरे मंडळींनीं राष्ट्रीयसभेंत फार महत्वाचीं भाषणें केलीं आहेत, तीं वाचलीं असतां हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेबद्दल कोणासही वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं.

रा० रंगराव मुधोळकर यांनीं हिंदुस्थानांतील व युरोपांतील शेतसाऱ्याची तुलना करितांना असें सांगितलें कीं, "ग्रेटब्रिटनमध्यें ३३ रुपये उत्पन्नाला १ रुपया शेतसारा आहे व युरोपमध्यें बहुतकरून ९० रुपये उत्पन्नाला १ रुपया असाच शेतसारा आहे. युरोपांतील अगदीं भिकार देश जो डेनमार्क तेथें २७ रुपये उत्पन्नाला १ रुपया शेतसारा आहे. आणि आमचा देश जो हिंदुस्थान तेथें ३ किंवा ४ रुपये उत्पन्नाला १ रुपया शेतसारा आहे!" खरोखर हें प्रमाण किती तरी चमत्कारिक आहे बरें? बरें, पुनः अशाप्रकारचा जबर सारा असून तो देखील कायमचा नाहीं! अशा स्थितीमध्यें आमच्या शेतकऱ्यांनीं काय बरें करावें? आमचें सरकार दुष्काळाच्या प्रसंगीं तरी सूट देत असेल म्हणावें तर तसेंही कधींच दिसून येत नाहीं. परवां विजापुराकडे दुष्काळ पडला त्या वेळीं सरकारानें सारा माफ केल्याचें कोठें ऐकण्यांत आलें नाहीं. तेंच देशी संस्थानांत पहावें तों तेथें अगदीं निराळी स्थिति दृष्टीस पडते. इंदूरचे होळकर महाराज, हैदराबादचे निजाम सरकार, बडोद्याचे गायकवाड किंवा मिरजे सारख्या छोट्याशा संस्थानचे मालक श्रीमंत पटवर्धन हे देखील प्रजेची हवालदिल स्थिति पाहून जमिनीचा सारा वारंवार माफ किंवा कमी करितात. तसें आमच्या सरकारानें कां बरें करूंनये? म्हणूनच आपली राष्ट्रीयसभा जमिनीचा सारा कायम व माफक करण्याबद्दल सरकारास विनवीत आहे. ही किती तरी चांगली गोष्ट आहे!

रंगराव मुधोळकर.



(उमरावतीचे वकील व राष्ट्रीय सभेचे भक्त.)

दुसरी मोठ्या दुःखाची गोष्ट ह्मटली ह्मणजे मिठावरील कर ही होय! मीठ हा पदार्थ कशाचा होतो हें कोणास निराळें सांगण्याची गरज नाहीं! परमेश्वरानें निर्माण केलेल्या पदार्थांवर देखील सरकारानें कर बसविला आहे. पूर्वी मीठ रुपयास ८-१२ पायली मिळत असून त्या योगानें प्रत्येकाच्या प्रपंच्याची बेगमी होऊन गुराढोरांसही तें घालावयास सांपडत असे. आतां तें कितीपटीनें महाग झालें आहे हें पाहिलें तर सरकारच्या अति हव्यासाची कमाल वाटते! पूर्वीच्या ८ पायल्या ऐवजी आतां तें ८ शेरही मिळेनासें झालें आहे. हाय हाय!! हा कर अत्यंत अन्यायाचा आहे अशा बद्दल विवेचन करितांना प्रिंगल केनडी, दिनशा एदलजी वाचा, आलफ्रेड नंदी, लाला मुरलीधर, पंडित अयोध्यानाथ वगैरे मंडळींनीं फारच कळकळीचीं भाषणें केलीं आहेत. लालामुरलीधर हे पंजाब प्रांतामध्यें अंबाला येथें प्रसिद्ध वकील आहेत. त्यांनीं अति उत्कृष्ट भाषण करून असें सांगितलें कीं, "मीठ हें सवा‍ंचें जविन आहे. तें श्रीमंतां प्रमाणें गरीबांसही अवश्यक आहे. त्यावर कर बसविणें ह्मणजे अत्यंत अन्याय होय! मिठावर कर बसविला तर तो मनुष्याच्या क्षुधातृषेवर कर बसविण्या सारखें आहे!! मीठ महाग करणें ह्मणजे हवा, प्रकाश आणि पाणी यांचा उपभोग घेण्याचें बंद करण्या प्रमाणें चमत्कारिक आहे!!" ही गोष्ट खरी आहे. तेव्हां मिठावरची जकात कमी करून तें सर्व लोकांस व जनावरांस पु-

ष्कळ मिळेल असें करावें अशी राष्ट्रीय सभा सरकारास प्रार्थना करीत असते.

सरकारानें आपल्या जवळचीं हत्यारें घेतल्यामुळें वनपशूं पासून व चोरट्यांपासून शेतांचें संरक्षण करणें अगदीं दुरापस्त झालें आहे. शेतांची गोष्ट एकीकडे राहो, पण प्रत्यक्ष आपल्या प्राणांचेंही संरक्षण करणें अगदीं कठीण झालें आहे. जेथें जेथें वनश्वापदें विशेष आहेत तेथें तेथें पुष्कळ प्राणी दरसाल मृत्युमुखीं पडत आहेत हें पाहून कोणासही या दुःखद आणि दुर्बल स्थितीचा तिटकारा आल्यावांचून राहणार नाहीं. सन १८८७ सालीं ९२००० जनावरें लांडगे, वाघ वगैरेनीं खाऊन टाकिलीं! असाम प्रांतांतील प्रसिद्ध गृहस्थ विपिन चंद्रपाल यानीं हत्यारांच्या कायद्या संबंधानें इतकें कांहीं हृदयद्रावक भाषण केलें आहेकीं, तें ऐकतांच नेत्रांतून अश्रु वाहतात! त्यांणीं या कायद्याबद्दलच्या कडक नियमांचें दिग्दर्शन करण्यासाठीं असें ह्मणून दाखविलें कीं, आमच्या जवळ सरकारानें तरवार, कट्यार, बंदुक वगैरे कांहीं राहूं दिलीच नाहीं, पण कृपा करून आमची लेखणी व जीभ ह्याचा त्या कायद्यामध्यें समावेश केला नाहीं, ही त्यांची खरोखर मोठी मेहरबानीच समजली पाहिजे. जुनी कट्यार किंवा जुनी गंजलेली तरवार सांपडली तरी त्यावर कायद्याचा अंमल सुरू होतो हा केवढा बरें अन्याय आहे? परवां पुणें येथें एका मराठ्याच्या लग्नामध्यें वधुवरांनीं गंजलेल्या कट्यारी ह्मातांत घेतल्या

ह्मणून त्यांना माजिस्ट्रेट साहेबांनीं दंडाची शिक्षा दिली!! केवढा अन्याय बरें? तेव्हां या कायद्यामध्यें फेरफार करण्या बद्दल राष्ट्रीय सभा सरकारास विनंती करीत आहे ती आपल्या सर्वांच्या कल्याणाची नाहीं काय?

बरें हत्यारांचे कायद्याचा जो आपल्यावर जुलूम होत आहे त्यापेक्षां जंगलच्या कायद्यानेंतर मनस्वी कहर उसळून दिला आहे. गुरांना चारा बिलकुल मिळत नाहीं!! बिचाऱ्या जनावरांच्या गळ्यांत पास आणि बिल्ले अडकवून सरकारी जंगलांतलि एका काडीसही त्यांनीं स्पर्श करूं नये असा पक्का बंदोबस्त केला पाहिजे. नाहींतर 'फारेस्ट यमदूतांचे' त्या अज्ञानी जनावरांवर व त्यांच्या अनाथ पालकांवर हल्ले होऊन त्यांना मामलेदार साहेबांपुढें नाकधुऱ्या काढण्यासाठीं उन्हातान्हांतून तालुक्याचे ठाण्याचे लांब लांबचे पल्ले मारतांना फार कष्ट सोसावे लागतात!! ह्या संबंधानें नागपूर येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेंत, मद्रास इलाख्यांतील तिणवल्ली शहराहून आलेले मुकत्यार पालपिटर पिल्ले ह्यानीं तिकडे होत असलेला जंगलाचा अनर्थ फारच उत्तम प्रकारें निवेदन केला. त्यांनीं गुरांच्या संहाराचें एकच उदाहरण सांगितलें. तें ऐकतांच खरोखर प्रत्येक मनुष्याच्या हृदयास पाझर फुटतील ह्यांत शंका नाहीं! त्यांनीं सांगितलें कीं, सन १८९१ च्या जानेवारी पासून तों सपटंबर पर्यंत अवघ्या ८ महिन्यांच्या मुदती मध्यें फक्त अर्काट प्रांता मध्यें

३०००० गुरें चारा नसल्यामुळें मृत्युमुखीं पडलीं! हरहर! केवढा हा अनर्थ!! अशा प्रकारें जर आपल्या गुरांचा संहार होत आहे, तर मग आपली शेती तरी कशी चालावी? आणि आपणांस दूध, दहीं, तूप वगैरे पदार्थ तरी कसे मिळावेत? अहो, आपल्या पोराबाळांचे जे हाडांचे सांपळे दिसत आहेत त्याचें कारण त्यांना दूध, तूप वगैरे पुष्टिकारक पदार्थ खावयास मिळत नाहींत हेंच नव्हे काय? हाय! हाय!! प्रजेचे असे हाल करून सरकार जंगल खात्यापासून किती पैसा उत्पन्न करीत आहे, हें मद्रास येथील हिंदु पत्राचे एडिटर वीरराघव चारियर ह्यानीं सप्रमाण सिद्धकरून दाखविलें आहे. वीरराघव हे मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या स्टांडिंग कमेटीचे सेक्रेटरी असून ते राष्ट्रीय सभेबद्दल अपरिमित कळकळ बाळगितात. ह्यांनीं असें सांगितलें कीं, सन १८७७ सालीं ज्या वेळीं हा कायदा सरकारानें पास केला त्या वेळीं तो फक्त प्रजेच्या हिताकरितां ह्मणून केला; पण आतां त्या बद्दल सरकार किती उत्पन्न करीत आहे तें पहा! फक्त मद्रास इलाख्यामध्यें सन १८७७ सालीं जंगलाचें उत्पन्न ४॥ लक्ष रुपये होतें तें सन १८८९ सालीं १३ लक्ष रुपये पर्यंत वाढलें आहे! तात्पर्य, असाच प्रकार सर्व प्रांतां मध्यें चालू आहे. ह्या संबधानें आपल्या सातार प्रांतांतून राष्ट्रीय सभेस गेलेले मुकत्यार रा० रा० रघुनाथ पांडुरंग करंदीकर ह्यांनींही आपल्या इकडची स्थिति सभे पुढें सचित्र मांडून फार हृदय द्राव-

एम्. वीर राघव चारियर.



(मद्रास स्टांडिंग कांग्रेस कमेटीचे सेक्रेटरी.)

क भाषण केलें! असो, एकंदरींत सरकारच्या ह्या कायद्या मुळें आपणांस जंगलांतील एक लांकूड, एक पान अथवा गवताची एक काडी देखील मिळेनाशी झाली आहे. आपलीं गुरें पटापट मरत आहेत. शेतांस खात मिळेनासें झालें आहे. तेव्हां ही आपली दुःखद स्थिती सरकारा पुढें सर्वांनीं मिळून मांडावयास नको काय? खरोखर आपली राष्ट्रीय सभा हें काम मनःपूर्वक करीत असते, हें ऐकून आपणांस फार आनंद वाटेल ह्यांत शंका नाहीं.

ह्या शिवाय आपली राष्ट्रीयसभा पोलिस खातें, अबकारीखातें, न्यायखातें, वगैरेची सुधारणा करण्या बद्दल, विद्या खात्यास मदत करण्याबद्दल, व कला कौशल्यास उत्तेजन देण्याबद्दल सरकारास प्रार्थना करीत आहे. पोलिस खात्या संबंधानें केव्हां केव्हां लोकांवर फार अन्याय होतात हें आपणांस माहीत असेलच. सन १८८८ सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या सभे मध्यें लखनौच्या मुनशी सय्यद हुसेन नामक एका गृहस्थानीं पोलिसच्या जुलमीपणाच्या संबंधानें सुंदर भाषण केलें, आणि सांगितलेंकीं लेफ्टनंट गव्हर्नर किंवा व्हाइसराय ह्यांच्योपेक्षां देखील एकाद्या चौकीदार किंवा कान्स्टेबल साहेब बहादुरास लोकांवर आपला अधिकार गाजविण्यास जास्त मोकळीक आहे. खरोखर त्याचा अनुभव आपणांस नेहमीं येतच असतो. पोलिसखात्याकडून रयतेचें वित्त व जीवित ह्यांच्या संरक्षणाची व्यवस्था किती उत्तम होत असते ह्याचीं जीं उदाहरणें आली-

कडे दृष्टी पडतात तीं फारच असंतोषकारक असतात. परवां धारवाडास पोलिस चौकीच्या जवळच दरवडा पडला! असो. तर ह्या गैरव्यवस्थेचें कारण पोलिस खात्यामध्यें अनुभवशीर व शहाणे लोक नसतात. कलकत्याचे कोणी अक्षयचंद्रदास नामक एक बाबू नागपूरचे सभेस आले होते, त्यांनीं ह्या पोलिसखत्या संबंधानें भाषण करितांना असें सांगितलें कीं, त्या खात्यामध्यें बहुतेक गैरमाहीत व तरुण असे गोरे लोक भरले असतात, व त्यांच्या हाता खालीं जे नेटिव लोक असतात ते देखील कमी पगाराचे व अक्कलशून्य असेच असतात. हें खरें आहे तेव्हां ह्या गोष्टीची सुधारणा अवश्य झाली पाहिजे.

अबकारी खात्याची तरी अशीच चमत्कारिक गोष्ट आहे. हें खातें प्रथमतः लोकांना मादक पदार्थाच्या सेवना पासून मुक्त करावें ह्मणून स्थापन झालें. पण तो त्याचा मुळचा हेतू एकीकडेसच राहून आतां तें खातें लोकां मध्यें दारूचा फैलाव करून, सरकारच्या खजिन्यामध्यें पैशाची भर करीत आहे असें दिसून येतें. ह्या संबंधानें कलकत्ता येथें भरलेल्या सन १८९० सालच्या सभे मध्यें दिनशा एदलजी वाचा व लालमुरलीधर ह्यांचीं फारच सुरेख भाषणें झालीं आहेत. मि० वाचा यांनीं दारूच्या उत्पन्नाची अशी माहिती सांगितली,— "दहा वर्षां पूर्वीं दारूचें उत्पन्न सरासरीनें ३८ लक्ष रुपये होतें तें आतां सु० ७४ लक्ष रुपये झालें आहे!! पूर्वीं १७ लक्ष ग्यालन

दारू जेथें पुरत असे तेथें आतां २७ लाख ग्यालन दारू लागते. दारूचे गुत्ते व दुकानें कमीतर झालीं नाहींतच पण उलट १८८७ सालीं जीं ४४२३ होतीं तीं आतां ४७३९ झालीं आहेत". खरोखर हें वाचतां क्षणींच कोणाचे ह्रदय फाटून जाणार नाहीं बरें? पंजाबच्या लाला मुरलीधरांनीं असें सांगितलेंकीं नुकत्या घेतलेल्या ब्रह्म देशामध्यें देखील इंग्रज सरकाच्या अमला समवेत दारूचे गुत्ते स्थापन झाले आहेत! खरोखर सरकार आह्मांस दारूबाज करून त्याच्यापायीं आमचा सत्यनाश करून टाकणार कीं काय नकळे? लाहोरचे पंडित सत्यानंद अग्निहोत्री व शिख लोकांचे गुरू प्रतापसिंग सोधीं ह्यानीं दारूपिणें हें महा पातक असून, तें लौकर बंदकरण्याचा पुष्कळ प्रयत्न चालविला आहे; पण त्याचा सरकारच्या मदती वांचून उपयोग होत नाहीं. तेव्हां राष्ट्रीय सभा ही त्याविषयीं सरकाराजवळ दाद लावीत आहे ही अत्यंत महत्वाची गोष्ट नव्हे काय?

ह्या शिवाय राष्ट्रीयसभा सरकाराजवळ पुष्कळ मागण्या करीत असून त्या सर्व वर सांगितलेल्या गोष्टीं प्रमाणें फार लोकोपयोगी आहेत. त्या सर्वांमध्यें तिची अत्यंत महत्वाची अशी जी मागणी आहे ती ऐकून आपणांस खरोखरच संतोष झाल्यावांचून राहणार नाहीं. त्या मागणीमध्यें राष्ट्रीय सभेचा असा हेतु आहेकीं, ज्याच्या योगानें हीं सर्व संकटें उत्पन्न झालीं आहेत, तें मूळच अजीबात तोडून काढावें. मित्रहो, आपणांस

हीं सर्व दुखें केवळ सरकारच्या कायद्यांमुळें होत असतात. हे कायदे कोण करितात हें आपणांस माहीत असेलच! कलकत्ता, मुंबई, मद्रास, वगैरे ठिकाणी जे मुख्य गव्हर्नर असतात ते व त्यांच्या कौन्सिलांतील सभासद मिळून कायदे करितात! कायदे करणारे लोक बहुतेक सरकारी कामदार असून साहेब असतात. ते इकडचे चांगले माहितगार नसल्यामुळें त्यांना लोकांची खरी स्थिति समजत नाहीं, त्या योगानें त्यांच्या हातून असे त्रासदायक कायदे होतात! ही फार दुःखाची गोष्ट आहे. हे कायदे करण्याच्या वेळीं जर आमच्या यतीचे खऱ्या कळकळीचे लोक तेथें असते तर असे कायदे कधींही झाले नसते!! आतां आमचें सरकार या कायदे मंडळांत आमच्या देशांतील कांहीं बडे लोक कीं ज्यांस लोकस्थितीचें ज्ञान नसून सरकारच्या ओंजळीनें पाणी पिण्याची फार सवय लागली आहे अशांस आपल्या कायदे कौन्सिलांत कधीं कधीं घेतें, परंतु त्याचा कांहीं उपयोग नाहीं! मिठावरचा कर बसवितेवेळीं एक बडे पारशी गृहस्थ कायदेकौन्सिलांत सभासद होते, त्यांनीं "लोकांना हा कर देण्याचें कांहीं ओझें वाटत नाहीं" असें साफ सांगितलें! ठीकच आहे, ज्यांना सरकारच्या होस हो देऊन रावबहादुरी किंवा नामदारी मिळवावयाची असते त्यांनीं असेंच ह्मटलें पाहिजे. ह्यापेक्षांही सरकारतर्फे नेमलेल्या सभासदाची एक मजेची गोष्ट रामपूरचे राजे राजारामपाल सिंग यानीं सांगितलीं आहे. ते ह्मणालेकीं माझ्या एका ना-

नामदार फेरोजशहा मेथा.



मुंबईचे ब्यारिस्टर व ६ व्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.

तेवाइक महाराजांस गव्हरनर जनरल साहेबांनीं आपल्या कायदे कौन्सिलचे सभासद नेमिलें होतें. त्या बिच्याऱ्यास इंग्रजी भाषेचा गंधही येत नव्हता. तेव्हां मी एकदां राजेसाहेबांस विचारिलें कीं, तुह्मी कायदेकौन्सिलाचें काम कसें करितां? त्यांनीं उत्तर दिलें. प्रथम प्रथम मला थोडीशी अडचण पडे! कारण मला इंग्रजी येत नसे आणि मजबरोबर कोणी दुभाषा मनुष्य नेण्याची परवानगी नसे. तेव्हां मग मी गव्हरनर साहेबांच्या मेहेरबानीनें मिळालेल्या जागेची कामगिरी बजावतांना त्यांचें अनुकरण करीं. लाट साहेबांनीं हात वर केला कीं मीही आपला हात वर करीं, व त्यांनीं आपला हात खालीं केला ह्मणजे मग मीही आपला हात खालीं करीत असें!" खरोखर किती ही शरमेची गोष्ट आहे!! ह्या वरून असें सिद्ध होतें कीं, ज्या कायद्यांमुळें सर्व प्रजा गांजली जात आहे, ते कायदे करण्याचा असा फार्स होत असतो. ह्मणूनच आनरेबल पंडित अयोध्यानाथ हे नेहमीं ह्मणत असत कीं, "सध्याचीं कायदे कौन्सिलें ह्मणजे शुद्ध तमाशा आहे." हर हर!! हा त्यांचा खेळ होतो पण प्रजेचा जीव जात आहे!! तेव्हां ही गोष्ट ध्यानीं घेऊन राष्ट्रीयसभा सरकाराजवळ असें मागणें मागत आहे कीं, सरकारानें ह्या कायदे करणाऱ्या कौन्सिलामध्यें प्रजेच्या तर्फेचे, विद्वान, राजव्यवहार चतुर व लोकहित जाणणारे असे योग्य पुरुष सरकारी सभासदां इतके घ्यावेत. ही एक गोष्ट झाली. आतां दुसरी गोष्ट कायद्याची

अम्मल बजावणी करणारे जे सरकारी कामगार आहेत त्यांच्या बहुतेक सर्व जागा युरोपियन लोकांस देण्यांत येतात, त्यामध्यें पक्षपात न करितां कांहीं नेटिवांची योजना करावी. गोरे लोक व काळे लोक हा भेद मनांत न आणतां हिंदुस्थानच्या लोकांस मोठमोठ्या महत्वाच्या जागा देण्या बद्दल व हिंदुस्थानच्या लोकांस युरोपियन प्रजे प्रमाणें वागविण्याबद्दल पार्लमेंटानें, लार्ड नार्थब्रुक, लार्ड लिटन, लार्ड रिपन, लार्ड डफरिन वगैरे व्हाइसरायांनीं आह्मांस हजारो वचनें दिलीं आहेत! ह्या संबंधानें आपल्या दयाळू महाराणी साहेबांनीं तर सन १८९८ सालीं एक जाहिरनामाच प्रसिद्ध केला आहे. पण हीं सर्व वचनें अद्यापि कागदावर जशींच्या तशींच पडून राहिलीं आहेत, तीं परिपूर्ण करून आह्मा २८ कोटी प्रजा जनांस राजकीय दुःखांतून मुक्त करा असा ह्या राष्ट्रीय सभेच्या सर्व मागण्यांचा मुख्य आशय आहे. ह्या वरून आपली अशी खात्री होईल कीं, राष्ट्रीय सभा जें काम करीत आहे, तें अत्यंत राजनिष्ठपणाचें आहे, तें अत्यंत शुद्ध आहे, तें केवळ सर्व हिंदुस्थानच्या प्रजेचें कल्याण आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

वरलि सर्व हकीकत वाचून आपणांस असें वाटेल कीं, ही राष्ट्रीय सभा श्रीमंत लोकांच्या हितापेक्षां गरीब लोकांचेंच हित विशेष करणार आहे. ह्मणून ह्या सभेला श्रीमंतांच्या सभे पेक्षां गरीबांची कामधेनु असें ह्मणणें हेंचयोग्य दिसतें. मगज्या अर्थी ती ग-

रीबांची कामधेनू आहे त्याअर्थी तिचें संरक्षण करणें व तिचा अभिमान बाळगणें हें देखील त्यांच्याकडे विशेष आहे. आज सतत आठ वर्षें पर्यंत अनेक स्वदेशाभिमानी लोकांनीं फार परिश्रम करून व स्वतःच्या द्रव्याचा व्यय करून ह्या राष्ट्रीय सभेचीं मुळें अगदीं खंबीर करून सोडलीं आहेत. एवढेंच नव्हे पण ह्या सभेवर अल्पसें संकट आलें तर तें आपल्या प्राणावर असें समजून तत्प्रीत्यर्थ स्वतःचे प्राण खर्ची घालण्यास तयार होण्यासारखे आज तिचे भक्त सर्व हिंदुस्थानांत निपजले आहेत. ह्या सर्व मंडळीची अशी उमेद आहेकीं राष्ट्रीयसभेची दाद जर हिंदुस्थानांत लागली नाहीं तर ती विलायतेंत राणी साहेबांजवळ व त्यांच्या मंत्री मंडळाजवळ (पार्लमेंट) लावावयाचीच लावावयाची! अर्थात ही सर्व त्यांची उमेद आपल्या करितां आहे. त्याअर्थी आतां आपण ह्या हिताच्या गोष्टी विषयीं काळजी घेणें आवश्यक आहे. आपले साधु पुरुष तुकाराम यानीं म्हटलें आहे.—

आपुलियाहिता, जो असे जागता ॥
धन्य मातापिता, तयाचीया ॥१॥

हें खरें आहे. आपण ज्या कीर्तिमान पूर्वज्यांच्या पोटीं निपजलों आहों, त्यांना धन्य करण्याकरितां आपण आपल्या हिताबद्दल --म्हणजे राष्ट्रीय सभेबद्दल—कळकळ बाळगणें हें आपलें कर्तव्य कर्मच आहे.

खरोखर वरील हकीकत ऐकून राष्ट्रीय सभे बद्दल आपल्या मनांत प्रीति उत्पन्न होईल यांत शंका नाहीं.

तथापि ह्या सभे पासून प्राप्त झालेल्या दृश्य फलांचीं दोन चार उदाहरणें आपल्या पुढें मांडलीं तर आपणांस तिच्या भावी यशाबद्दल पूर्ण खात्री पटेल आणि तिजबद्दल आपल्या मनामध्यें जास्त विश्वास उत्पन्न होईल.

महाराज, आज पर्यंत आपल्या राष्ट्रीय सभेनें सरकार जवळ ज्या मागण्या केल्या आहेत, त्या थोड्या थोड्या सिद्धीस जाऊं लागल्या आहेत. सरकारच्या कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त असे ज्यास्त सभासद नेमावेत ह्मणून तिची जी मागणी आहे ती सरकारानें थोडीशी मान्य केली आहे. पूर्वीं ज्या कौन्सिलमध्यें १२ सभासद असत तेथें ते २० असावेत असा नुकताच ठराव झाला आहे. अबकारी व पोलीस खात्याबद्दल सुधारणा होण्याची पुष्कळ चिन्हें दिसूं लागलीं आहेत. राष्ट्रीय सभेच्या चळवळीपासून मद्रास सरकारानें दारूचीं ७००० दुकानें बंद केलीं आहेत ! बंगाल, पंजाब व वायव्यप्रांत इकडेही तशाच प्रकारची थोडथोडी व्यवस्था होऊं लागली आहे. सरकारच्या खजिन्याची स्थिति सुधारतांच मिठावरील कर प्रथम कमी करण्यांत येईल असें व्हाइसराय साहेबांनीं सेंट अंड्र्यूजच्या भोजनसमारंभांत बोलून दाखविलें आहे. त्याचप्रमाणें न्याय करण्याचें व त्याची बजावणी करण्याचें काम एकाच अधिकाऱ्याकडें असूं नये ह्मणून जी या सभेची विनंति आहे ती सरकारानें मान्य करून मद्रास इलाख्यांत तसें करण्याची सुरुवात केली

रायबहादूर पी आनंदाचार्लू.



(नागपूर येथील १८९१-च्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.)

आहे, व त्याबद्दल १०९ नवीन कामगारांच्या जागा नेमिल्या आहेत. खरोखर ह्यावरून आपली राष्ट्रीय सभा जें काय मागत आहे तें सर्व हळू हळूं सिद्धीस जाईल असा रंग दिसत आहे. ह्याकरितां ही सभा प्रत्येक वर्षी हिंदुस्थानांत तर भरवीत जावीच, पण एक वेळ ती खुद्द महाराणी साहेबांच्या लंडन राजधानींत भरवावी ह्मणजे सर्व साहेब लोकांस आपल्या देशाची खरी स्थिति माहीत होऊन ते राष्ट्रीय सभेच्या सर्व मागण्या मान्य करण्याबद्दल राणीसाहेबांच्या मंत्रीमंडळास सांगतील अशी त्यांच्या उदारवृत्तीवरून आशा बाळगण्यास हरकत नाहीं. यंदा हिंदुस्थानांत प्रयाग येथें आठवी राष्ट्रीय सभा भरविण्याची कडेकोट तयारी तिकडच्या प्रांतांतील लोक करीत आहेत. राजा रामपालसिंह, पंडित मदनमोहन मालवीय व स्वामी अलाराम हे तिघे गृहस्थ तिकडे राष्ट्रीय सभेबद्दल एकसारखीं व्याख्यानें देऊन राष्ट्रीय सभेचा उपयुक्त पणा त्यांच्या अंतःकरणांत बिंबवीत आहेत. त्यामुळें तिकडचे लोकही काया वाचा मनें करून ह्या सभेस मदत करीत आहेत. त्यांच्या प्रमाणें आपल्या प्रांतांतील लोकांनींहि राष्ट्रीय सभेस मदत केली पाहिजे. राष्ट्रीयसभा हें फार खर्चाचें काम आहे. त्यांतून ती विलायतेस भरविली तर फारच खर्च येईल, तेव्हां ह्या खर्चाकरितां आपल्या प्रांतांतील लोकांनीं होईल तितकें द्रव्य साह्य दिलें पाहिजे. खरोखर, ज्या प्रमाणें परमेश्वरा प्रीत्यर्थ धार्मिककृत्यांकडे जें द्रव्य आपण अर्पण

करितों तितकें सत्कारणीं लागून आपल्या कल्याणास कारणीभूत होतें त्या प्रमाणेंच राष्ट्रीय सभेस जितकी मदत आपण कराल तितकी आपल्या कल्याणास खचित कारणीभूत होईल. किंबहुना ती गांवच्या देवाच्या जत्रेस किंवा अशाच दुसऱ्या एकाद्या धार्मिक कृत्यांत खर्च केलेल्या पैशा पेक्षांही फार महत्वाची होणार आहे. खरोखर पाहिल तर राष्ट्रीय सभा ही परमेश्वरानें सत्पुरुषांच्या अंतःकरणांत प्रेरणा करून उत्पन्न केलेली संस्था आहे, त्या अर्थी ती परमेश्वर स्वरूपीच आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. कानपूर येथील सद्गृहस्थ पंडित गिरिधारीलाल चोबे यानीं, राष्टीय सभा ही केवळ देवी असून तिला मदत करणें ह्मणजे आपल्या कुळस्वामिणीस मदत करण्या सारखें पुण्य कारक आहे. अशा अर्थाची पद्य रूपानें त्या प्रांतांतील लोकांची प्रार्थना केली आहे. प्रयागचे स्वामी अलाराम ह्यानीं कांग्रेस ( राष्टीयसभा ) चें जें भजन केलें आहे त्याचे प्रारंभींच ह्मटलें आहें कीं,—

दोहा.

भजन सुनो कांग्रेसका जपो एक भगवान ॥<br>
धारी मनमें साच करो मारो मिथ्या मान ॥ १ ॥

हें अगदीं खरें आहे. ह्याकरितां राष्ट्रीय सभा ही केवळ आपल्या गांवची देवता आहे असें समजून तिच्या सांवत्सारिक उत्सवास लागेल ती मदत करण्यास कोण बरें तयार होणार नाहीं ? खरोखर ह्या देवावर निष्ठा ठेविली व त्यास अंतःकरणपूर्वक प्रत्येकानें यथाशक्ति

मदत दिली तर तो आपणांस खचित खचित प्रसन्न होईल आणि आपणांस धनधान्य समृद्धि देऊन आपलें, आपल्या पुत्रपौत्रांचें व एकंदर देशाचें अत्यंत कल्याण करील ह्यांत बिलकुल शंका नाहीं. त्यावर दृढ भाव मात्र ठेविला पाहिजे. म्हणजे आपलें कल्याण झालेंच म्हणून समजावें. बंगालप्रांतांत बाबू रामगोपालसिंह ह्या नांवाचे एक वकील ह्या राष्ट्रीय सभेचे मोठे भक्त आहेत. ते आपल्यावर अनंत संकटें आलीं असतांही —प्रत्यक्ष त्यांचा एकुलता एक मुलगा मरणोन्मुख असतांही—राष्ट्रीय सभेस आले. त्यावेळीं खरोखर त्यांच्या राष्ट्रीय सभेवरील खऱ्या निष्ठेमुळें त्यांचें कांहीं एक नुकसान न होतां, उलट फार कल्याण झालें. एवढेंच नव्हें, पण त्यांचा मुलगा देखील अगदीं बरा झाला ! ! तात्पर्य, ‘ निश्चयाचें बळ । तुका म्हणें तेंचि फळ ’ हें अगदीं खरें आहे.

ह्याकरितां, स्वदेशबांधवहो, तुह्मीं राष्ट्रीय सभेवर दृढ भाव ठेवा आणि तिला मदत करून यश संपादण्याचा पूर्ण निश्चय करा. राष्ट्रीय सभेस तुह्मीं आपल्या तर्फेचे चांगले कळकळीचे व माहितगार लोक पाठवा व त्यांच्या मार्फत आपलीं सर्व संकटें व गरजा तेथें सांगा, मित्रहो, गप्प बसून आपलीं संकटें परिहार होणार नाहींत. आतां राष्ट्रीय सभेच्या मागण्या हिंदुस्थानांत परिपूर्ण होणार नाहींत असें दिसून आल्यामुळें तिचे प्रमुख लोक थेट महाराणीसाहेबांजवळ दाद लावण्याकरितां विलायतेस सभा भरविण्याचा निश्चय करतील,

तर तुह्मीं त्यांस जो खर्च लागेल तो यथाशक्ति अवश्य द्या. कारण तसें केल्यावांचून आपली दाद राणीसाहेबांजवळ लागावयाची नाहीं. आपणांस माहीत असेलच कीं, पूर्वी शिशुपाल आणि वक्रदंत यांनीं पृथ्वी जजर करून सोडली, पर्जन्यापेक्षां गाई, ब्राह्मण, तडी तापडी आणि अनाथ लोकांच्या रक्त-मांसांनीं पृथ्वी न्हाणिली, तेव्हां साठ सहस्र ऋषी इंद्राकडे गेले आणि त्याची प्रार्थना करून त्यांनीं त्यास हा अनर्थ सांगितला. इंद्र ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्यांनीं त्यास तसेंच सांगितलें. ब्रह्मदेवास हें संकट आपल्याच्यानें निवारण होणार नाहीं असें वाटून साठ सहस्र ऋषींसह ते क्षीरसागरीं गेले आणि भगवंताची दीन वाणीनें स्तुति करून, त्यांनीं हे आपलें हाल आणि कष्ट तेथें निवेदन केले. तेव्हां भगवंतास करुणा येऊन त्यांनीं लोकपीडा दूर केली. त्याप्रमाणें आपणांला क्षीरसागरीं वसत असलेल्या महाराणी साहेबांकडे गेलें पाहिजे. त्या अत्यंत कृपाळू असल्यामुळें आपल्या विनंतीचा योग्य विचार करून आपलीं सर्व संकटें नाहींशीं करतील ह्यांत शंका नाहीं. विलायतेहून सन १८९० सालीं कलकत्याच्या सभेकरितां मि० केन ह्या नांवाचे एक उदार मनाचे साहेब इकडे आले होते. त्यांनीं तर असें ह्मणून दाखविलें कीं, तेथें गेल्यानंतरहिंदुस्थानच्य संकटांचा योग्य विचार होईलच होईल, पण महाराणीसाहेब देखील हिंदुस्थानतर्फे तिकडे जाणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या मुखत्यारांस आपल्या बकिंगह्याम राजवाड्यांत निमंत्रण करून त्यांचें

पंडित मदनमोहन मालवीय.



(अलाहाबाद येथील राष्ट्रीय सभेचे निस्सीम भक्त.)

फार स्वागत करतील ! असो, ह्या त्यांच्या ह्मणण्या-वरून प्रस्तुतची संधि केवळ अमृतासिद्धीयोगापेक्षांही फार महत्वाची व पुण्यकारक आहे ह्यांत काडीमात्र संशय राहिला नाहीं. ह्याकरितां ह्या वेळेस प्रत्येकानें आपापल्या शक्तिप्रमाणें राष्ट्रीय सभेस द्रव्याच्या रूपानें आणि अंगमेहनतीच्या रूपानें उत्तम प्रकारची मदत करून आपल्या जन्माचें सार्थक करावें अशी आमची सर्वांस हात जोडून सविनय प्रार्थना आहे. ती परमेश्वर सफल करो.

**राष्ट्रीय सभेचा जयजयकार होवो.**



## शेवटची प्रार्थना.

राष्ट्रीय सभेची खरी माहिती सोप्या शब्दांनीं व साध्या रीतीनें सर्व साधारण लोकांस समजावून सांगणें फार अगत्याचें काम आहे. तें अल्पांशानें तरी सिद्धीस न्यावें अशी इच्छा झाल्यावरून हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे. हें पुस्तक लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांच्या नजरेखालून गेलें अथवा अशिक्षित लोकांना वाचून दाखविण्याची व्यवस्था केली तर ठिकठिकाणच्या स्टांडिंग कांग्रेस कमिट्या व राष्ट्रीय सभेसंबंधानें सर्व लोकांस माहिती करून देण्याबद्दल काळजी वाळगणारे सद्गृहस्थ ह्यांस पुष्कळ मदत होईल अशी आशा आहे. राष्ट्रीय सभेबद्दलची माहिती वाचण्याकडे लोकांचें चित्त आकर्षित व्हावें ह्या हेतूनें कांहीं राष्ट्रसभा भक्तांचीं चित्रेंही मधून मधून घातलीं आहेत. ही अंतःकरणपूर्वक केलेली अत्यल्प सेवा प्रिय देशबांधवांस पसंत होऊन तिचा चांगला उपयोग झाला ह्मणजे लेखकाच्या श्रमाचें सार्थक होईल.

सातारा, ता० २७।११।९३.

एक दक्षिणप्रांतस्थ राष्ट्रसभाप्रतिनिधि पुस्तककर्ता.

वैद्यक विषयाचें ज्ञान अबालवृद्धांस होण्याकरितां, सतत मोठ्या परिश्रमानें, लक्षपूर्वक माहिती मिळवून, छापण्याचें काम चालू आहे. याच्या चांगुलपणाबद्दल शेंकडो विद्वान व मार्मीकलोकांचे उत्तमउत्तम अभिप्राय चहूंकडून एकसारखे येतआहेत. केवळ महाराष्ट्रांतचनव्हे तर हिंदुस्थानांतील सर्व देशभाषेतून भाषांतरें होण्याबद्दल खटपटी चालू आहेत.

## सुप्रसिद्ध!] आर्यभिषक् [मासिकपुस्तक.

या बद्दलची जाहिरात, आम्हीं आमच्या शब्दानें न लिहितां लोकांच्या अभिप्रायांतील थोडक्याशा शब्दानेंच देत आहों; तिकडे लक्ष्य असावें, "हें आति नियमित आहे इतकेंचनव्हे, तर यांतील योजनाही सर्वोत्कृष्ट असते. वनस्पतींच्या खाणाखुणा, त्यांचीं नांवें, रोगनिदानें, मात्रा व भस्में वगैऱ्यांची माहिती, इत्यादि हजारों उपयुक्त माहितीतें हें भरपूर भरलेलें असतें." याची वाखाणणी करणारां पैकीं सुप्रसिद्ध अशीं थोडींशीं नांवें देतों तीं पहा:-डा० घोले, डा० भिकाजी, डा० भाटवडेकर, डा० देशमुख, डा० गोपाळ शिवराम, देवास-स्टेटसर्जन पाठक; वैद्य बाळासाहेब लद्दू; इंदुरकरवैद्य, वैद्य बिवलकर; रा. ब. मोरो चिं. जोशी; केसरी; केरळ कोकिळ; वार्ताहर; बकुल; जगद्धितेच्छु इत्यादि, इत्यादि.

☞ आर्यभिषक घेणारांस 'राजवैद्य' मासिकपत्र दरमहा फुकट मिळतें. फक्त राजवैद्यास वर्षास ९ आणे.
पत्ता...मुंबई, नवानागपाडा, आ. भि. कचेरी.

### शंकर दाजी शास्त्री पदे, चिकित्सक, आ०कर्ते.

शिवाय वरील ठिकाणीं,-इतर पुस्तकें व औषधें विकत मिळतात. अर्धा आणा पाठविला असतां, एकंदर माहितीचें छापील पत्रक फुकट पाठवूं. वनौषधी गुणादर्श,-भाग १ ला ०१२; भा. २रा १ रु.; भाग ३ रा १॥ रु. सुबोध वैद्यक-पूर्वार्ध ८ आणे; उत्तरार्ध १ रु. औषधी बाड कापडी २॥ रु.; कागदी २ रु. गोवैद्यक २ आणे. प्राणिज औषधी ३ आणे; अश्वरोग परिज्ञान पाऊण आणा. शिवाय प्रत्येक पुस्तकास टपालखर्च एक आणा.

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, कामोत्तेजक अत्यंत धातुशोधक सुवर्ण मौक्तिक कस्तुरीमिश्र अपूर्व गुटिका.

शरिराची उत्तम सुधारणा करणारी अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत त्यांत या गोळ्या अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, पांडुरोग, क्षय, मळव्याधि, मूत्रसंकोच, कटिवात, वातरोग, उपदंशसंबंधी झालेले विकार, हात, पाय, व मूत्रमार्ग यांचा दाह, ठणका इ० अनेक विकार त्वरित व निश्चयें बरे होतात. मग ते रोग कितीही वयाचे मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें जातात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थरोग यांचें निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि वाढतात. ज्यांस अभ्यास करण्याचे, लिहिण्याचे, व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं भरपूर शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो. सुस्ती जाते. ज्यांना दूध व जड पदार्थ पचत नाहींत त्यांस ते यांणीं पचूं लागतात. कोठ्यांतील अनियमित व्यापार नियमित होतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून, यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकेटें आहेत, सबब जास्त लिहीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून स्त्रिया पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत, वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गोळ्यासारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट म्हणतो. यांस पथ्य सेवनाचा गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात यामुळें त्यांचा अतिशय खप होत आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या

गोळ्या घेणारांस मात्र टपाल खर्च माफ आहे. अनुपानाचा कागद सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु०, ३६ गो० २ रु०, ८० गो० ४ रु०, १३० गो० ६ रुपये.

## थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक काजळ अत्यंत स्तुत्य आहे. हें सतत दहा वर्षांच्या अनुभवानें कळवितों. डोळ्यांचे साधारण विकार सहजच परंतु दृढ झालेलें तिमिरांध्य, फूल, कांच, सारा, भोर, गळती, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका लाली, खुपऱ्या इ० रोग कितीही जोरदार किंवा जुनाट असले तरी तत्संबंधीं मस्तकशूलासह इजा बिलकुल न होतां नाजूक रीतीनें तावडतोब बरे होतात आणि दृष्टि तीव्र व थंडगार रहाते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें, अग्नीचा शेक, अतिवाचन, कडकी, उपदंशविकार, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यानींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. मुलें, स्त्रिया, व पुरुष यांस हें फार उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रु०.

## कर्णस्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वहाणें व तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव इ० विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणताही प्रकारचे साधारण व्रण तर तत्काळच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १. शिवाय प्या० ख० २ आणे. रोखीनें किंवा व्हा० पे० पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपानखर्डा बाटली सोबत. टपालखर्च वेगळा पडेल.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.**

पत्ता--मु० आंजर्लें ता० दापोली जिल्हा रत्नागिरी.

# मुंबईचा व्यापार.

## आणि

## मल्लापा वसापा वारद [सोलापूर] यांच्या चनबसापा मल्लापा वारद या नांवाच्या मुंबई येथील दुकानांतील अडत, मजुरी वगैरे बद्दल नियम.

या नांवाचें पुस्तक आम्ही छापून तयार केलें आहे. यांत मुंबईंतील व्यापाराची अनेक प्रकारची माहिती दाखल केली आहे. किराणा माल, धान्य वगैरे मालाच्या वजन मापा बद्दल व तें वजन किती सुर्ती रुपये भार असतें, याजबद्दल ५०० जिनसांची यादी कोशा प्रमाणें विल्हेवार दिली आहे. मुंबईतील वजनमापाचा जो घोंटाळा आहे, तो फारच विलक्षण आहे. प्रत्येक जिनसाचा भाव निरनिराळे प्रमाणावर असतो यामुळें ते सर्व प्रकार ध्यानांत राहणें अशक्य आहे; कित्येकांचा भाव खंडीवर असतो, कित्येकांचा मणावर, कित्येकांचा हंड्रेडवेटावर, कित्येकांचा रत्तलावर, असे अनेक प्रकारावर असून खंडीचे मणाचें प्रमाण एकच प्रकारचें नसतें. ११ मणापासून ३० मणा पर्यंत खंड्या असतात. त्याच प्रमाणें मणांतही अनेक भेद आहेत. सुर्तीमण, मुंबईमण, सुर्ती ४१-४१।-४२ ४३।-४४-४५ पर्यंत शेरांचे मण असतात. असे अनेक प्रकार असल्यामुळें कोणत्या जिनसाचा भाव कोणत्या वजनावर असतो ही माहिती अर्थातच देशावरील व्यापाऱ्यास तर काय, पण मुंबईतील व्यापाऱ्यास सुद्धां फारच कमी असतें असें ह्मणणें गैर वाजवी होणार नाहीं. ही व्यवहारांत नेहमीं पडणारी अडचण दूर करण्याचा साधारण यत्न या पुस्तकांत एके प्रकरणांत केला आहे. त्याच प्रमाणें देशावरून येथें किराणा, कापूस, धान्य, नीळ वगैरे माल विक्रीस येतो तो कोणत्या गुणाचा असला ह्मणजे त्यास भाव चांगला येऊन फायदा होईल ही मालाच्या परीक्षेची साधारण माहिती दिली आहे. शिवाय मुंबईत कोणता माल कोणत्या दिवसांत खराब हवेनें बिघडतो हें समजल्यानें देशावरील व्यापाऱ्यांस खरेदी लिहून मागविण्यास अडचण पडणार नाहीं. याजकरितां ही माहिती दिली

आहे. आमच्या दुकानाशीं व्यवहार करणारे व्यापाऱ्यास आवश्यक लागणारी अडत मजूरी वगैरेच्या दराबद्दल सविस्तर माहिती नमूद केली आहे.

या पुस्तकाचा उपयोग सामान्य लोकांसही व्हावा या हेतूनें किमत अगदींच माफक ह्मणजे १० आणे ठेविली आहे; पुस्तक डेमी द्वादश पत्री सांच्याचें असून ३३६ पानांचें झालेलें आहे. ह्या मानानें सदरहू किमत ज्यास्त आहे असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. बाहेरगांवच्या लोकांस किमती शिवाय टपाल खर्च २ आणे जास्त पडेल. पुस्तक व्ह्याल्युपेबलनें पाठविण्या विषयीं लिहिलें असतां अगर मनीआर्डर पाठविली असतां पुस्तक पाठविण्यांत येईल. हीं पुस्तकें विक्रीस ठेवण्याचीं ठिकाणें या पुस्तकाच्या पृष्ठभागीं लिहिलीं आहेत तिकडे मागविलीं असतांही पाठविण्यांत येतील

**चनबसापा मलापा वारद,**
कमिशन एजंट व मर्चंट.

**मुंबई** – मांडवी, खांडबाजार, ता० २६-१०-९२.

---

# अनुभवानें आणि परीक्षेनें खात्री झालेलीं औषधें.

भारी अजब वस्तु!!!

## मदनसंजीवनी गोळ्या

सुवर्ण भस्माच्या (सोन्यच्या) मिश्रणानें बनविलेल्या.

ईश्वरनिर्मित इंद्रियाची शिथिलता, निर्बलता, नपुंसकत्वासारखी क्षीणता, आणि स्वप्नावस्था, इत्यादि सर्व दोष ह्या उत्तम गोळ्यांनीं दुरुस्त होऊन कोणत्याही वयाच्या कामीजनांस धातुपौष्टिक, वीर्यस्तंभक, कामोत्तेजक, मनोत्साहवर्धक इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण अति त्वरेनें प्राप्त होतात. ह्याच गोळ्यांनीं गर्मी [उपदंश] पासून स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या जननेंद्रियावरील नवीन आणि जुनाट चट्टे, व्रण, आणि शरीराच्या कोणत्याही भागावरील गर्मीचे सर्व प्रकारचे विकार, व अजीर्णाचे, पित्ताचे, कटिशूलादि वाताचे आणि

अशक्तीचे सर्व विकार, मग ते कितीही जुनाट असले तरी अति सत्वर दुरुस्त होऊन रतिसुखास संपूर्ण आणि कायमची शक्ति प्राप्त होऊन प्रकृती सदृढ आणि निरोगी ठेविते. एका मनुष्यास २० पासून ५० गोळ्यांपयत घ्याव्या लागतील. किंमत दर आठ गोळ्यांस १ रुपयाप्रमाणें. व्ही. पे. नें. १०० गोळ्यांपर्यंत टपाल खर्च १० आणे. गोळ्या घेणारांची प्रकृती कळवा. पत्ता बाळबोध लिहावा.

## अद्भुत चमत्कार!!!

# मदन संजीवनी तेल.

## अगदीं खत्रीचें आहे.

[ २,००० वर कुप्या खपल्या. ]

ईश्वरनिर्मित इंद्रियाची शिथलता, निर्बलता, नपुंसकत्वासारखी क्षीणता, आणि स्वप्नावस्था, इत्यादि सर्व दोष ह्या चमत्कारिक तैल मर्दनानें दुरुस्त होऊन कामीपुरुषांस धातुपौष्टिक, कामोद्दीपक, वीर्य स्तंभक, मनोत्साहवर्धक, इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण प्राप्त होतात. मग ते दोष कोणत्याही वयाच्या मनुष्याम कितीही दिवसांचे आणि कशाही कारणानें प्राप्त झालेले असोत, ते सर्व ह्या तैलमर्दनाच्या बाह्योपचारानेंच पथ्य नसतां बरे होतात. ह्या गुप्त रोगाच्या शेंकडो मनुष्यांस आज आठ वर्षां पासून बराच गुण आल्या कारणानें हें औषध लोकोपयोगास ठेविलें आहे. किंमत अर्ध्या औंसाच्या बाटलीस सव्वादोन रुपये. बंगी नाटपेड. व्ही. पे. नें किंमत आणि खर्च मिळून २ रु. १० आण.

सूचना-- वरील दोन औषधें प्रत्येकी निरनिराळींच आहेत. तरी दोन्हीं औषधें एकाच वेळीं उपयोगांत आणल्यास फारच बरें आहे.

**डाक्टर के. बी. बुलेल, एम्. डी., डाक्टर के. आर. विकाजी. एम्. डी., डाक्टर जे. जे. प्रीबल. इत्यादी अनेक विद्वान डाक्टरांच्या सर्टीफिकिटा असल्या आहेत.**

या औषधांनीं गुण झालेल्या अनेक सद्गृहस्थांचे दाखले औषधासोबत पाठवूं.

वरील औषधासोबत अनुपान पत्र येईलच.

पत्ता सुवाच्य बालबोध लिहावा.

रामकृष्ण पांडुरंग, माजी स्कूलमास्तर,
बिळगी, तालुका सिदापूर, जिल्हा उत्तरकानडा.